# प्रेस नोट दिनांक ०७/०८/२०१७

## मोटार सायकल चोरनाऱ्या सराईत गुन्हेगारास गुन्हे शाखा, युनिट १, पुणे शहरच्या टिमने केली अटक

गुन्हे शाखा, युनिट-१, पुणे शहरचे अधिकारी व कर्मचारी यांनी मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पुणे शहरामध्ये वाहन चोरीच्या गुन्हयांमध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली होती. त्या अनुषंगाने तसेच आज राखी पौर्णिमा असल्यामुळे चैन स्नॅचिंग होवू नये म्हणुन वरिष्ठांचे सुचना प्रमाणे युनिट १ चे हद्दीत वाहन चोरी व चैन स्नॅचिंग प्रतिबंधात्मक पेट्रोलींग करीत असतांना एक इसम आशीश गार्डन चौक येथे रस्त्याच्या कडेला पॅशनप्लस गाडीवर इसम नामे आकाश राजेंद्र गोळे, वय २० वर्षे, रा मु. पो. किवत, ता भोर, जिल्हा पुणे संशईतरित्या बसलेला व सदर गाडीस नंबर प्लेट नसलेली दिसुन आलेने त्याचेकडे अधिक चौकशी केली असता, त्याने सदर मोटार सायकल ही चोरीची असलेचे व त्याने आणखी चार मोटार सायकल हया पुणे शहरातुन ठिकठिकाणाहुन व पुणे ग्रामीण परिसरामधुन चोरल्याचे सांगितले. त्याचेकडून पॅशन प्लस दोन, पॅशन प्रो एक, स्प्लेंडर एक व सीडी डीलक्स एक अशा एकुण पाच मोटार सायकल कि. रु. १,८०,०००/- जप्त करण्यात आलेल्या आहेत.

सदरची कारवाई ही श्री. प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे. श्री सुरेश भोसले, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितिन भोसले-पाटील, स.पो.निरी. धनंजय कापरे, पो उप निरी. दिनेश पाटील, हर्षल कदम, सहा पो फौज राजाराम सुर्वे, गजानन सोनुने, पो हवा प्रकाश लोखंडे, मेहबुब मोकाशी, पो.ना. सुधाकर माने, तुषार खडके, कैलास गिरी, पो.हवा. रिजवान जिनेडी, उमेश काटे, श्रीकांत वाघवले, इरफान मोमीन, सुभाष पिंगळे, सुरेंद्र आढाव, उमेश काटे, विजयसिंग वसावे, अशोक माने, , प्रशांत गायकवाड, मोहन येलपले, यांनी केली आहे.

पोलीस उप आयुक्त,<br>
गुन्हे, पुणे शहर

